# मुंबई विद्यापीठ

क्र.संलग्नता १/AFF/१८८ /२०१५-16/20

विषय : महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषदेच्या बैठकीच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत....

संदर्भ : (१) उप सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे क्रं.उशिप २०१५/प्र.क्र. ६२६/विशि ३ दिनांक १७ ऑक्टोबर २०१५ रोजीचे पत्र.

(२) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रं.युएनआय/उशिप/२०१५/नावि/विशि-१ दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५ रोजीचे पत्र.

प रि प त्र क :

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित / मान्यताप्राप्त महाविद्यालयांचे/संस्थांचे प्राचार्य / संचालक तसेच शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून नविन महाविद्यालये / अभ्यासक्रम / तुकडी/ विषय सुरू करण्यास इच्छुक असलेले सर्व संबंधीत संस्था / सोसायटी / ट्रस्टचे अध्यक्ष / सचिव यांना उपरोक्त संदर्भीय विषयाबाबतचे पत्रानुसार कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्याच्या उच्च शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी दिनांक २० जुलै २०१५ च्या शासन निर्णयान्वये डॉ. नरेंद्र जाधव, प्रसिध्द अर्थ व शिक्षण तज्ञ यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील बृहत आराखडा संदर्भात सर्वसाधारण निकष तयार करण्याकरिता समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने तयार केलेले निकष राज्य उच्च शिक्षण परिषदेच्या दिनांक १४ ऑक्टोबर २०१५ रोजी झालेल्या बैठकीत मान्य करण्यात आल्याच्या अनुषंगाने सदर निकषांनुसार विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रचलित महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता नविन महाविद्यालय / अभ्यासक्रम / तुकडी / विषय सुरू करण्याबाबतचे प्रस्ताव दिनांक ३० ऑक्टोबर २०१५ पर्यंत सादर करण्यासंदर्भातील जाहिरात देणे, प्रस्ताव घेणे इत्यादी कार्यवाही करण्यास तुर्तास स्थगिती देण्यात आलेली आहे.

तरी, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमाच्या तरतुदीनुसार सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचे नविन महाविद्यालय / अभ्यासक्रम / तुकडी / विषय सुरू करण्यासंबंधीचे प्रस्ताव मागविण्याबाबचे वेळापत्रक शासनाकडून प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार याबाबत जाहिरात देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

21/10/15

( डॉ. एम.ए. खान )
कुलसचिव

मुंबई ४०० ०३२
२१ ऑक्टोबर २०१५

प्रति

सर्व संलग्नित / मान्यताप्राप्त महाविद्यालयांचे/संस्थांचे प्राचार्य / संचालक तसेच शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून नविन महाविद्यालये / अभ्यासक्रम / तुकडी/ विषय सुरू करण्यास इच्छुक असलेले सर्व संबंधीत संस्था / सोसायटी / ट्रस्टचे अध्यक्ष / सविच